

# जेष्ठांचे न्यायाधिकार

ॲड (डॉ) संतोष अ. शहा,

कोल्हापूर

- २००० ते २०५० मध्ये भारताची एकूण लोकसंख्या ५५ टक्क्यांनी वाढेल.
- यातील ६० वर्षावरील व्यक्तींची लोकसंख्या ३२६ टक्क्यांनी वाढेल.
- सबब जेष्ठ नागरीकांची संख्या ही सर्वात वेगाने वाढणारी संख्या आहे.
- जगातील एकूण जेष्ठ नागरिकांपैकी १/८ नागरीक भारतात राहतात.

# जेष्ठांचे अधिकार

- सरकारने दिलेले अधिकार
- कायदयाने दिलेले अधिकार
- सामाजिक , आर्थिक, कायदेशीर, वैदयकिय

# सरकारने दिलेले अधिकार

- नॅशनल पॉलिसी ऑन सिनिअर सिटिझन्स १९९९, २०११
- डिपार्टमेंट ऑफ सोशल जस्टीस ॲण्ड एम्पॉवरमेंट – ॲडव्हायजरी फॉर सिनिअर सिटिझन

# सरकारने दिलेले अधिकार

- ६० वर्षावरील व्यक्तींना प्रवासामध्ये असलेली सवलत
- ६० वर्षावरील व्यक्तींना सार्वजनिक ठिकाणी व्हिलचेअर अथवा तत्सम मदतीची सोय,
- टॅक्समध्ये सवलत,
- बॅकेतील एफ.डी मध्ये जादा व्याजदर,
- वेलफेअर स्किम्स
- वैदयकिय उपचाराबाबतच्या स्किम्स
- सिनिअर सिटिझन कार्ड

# कायदयाने दिलेले अधिकार

- कलम २१ भारतीय राज्यघटना – सर्वांना सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार
- मालमत्तेचा अधिकार,
- आर्थिक अधिकार,
- स्वत:चे मालमत्तेबाबत इच्छापत्र/ मृत्यूपत्र करणेचा अधिकार,

- स्वत:च्या मालमत्तेचे स्वत:चे मर्जीप्रमाणे व्यवस्था करता येते.
- पुढील पिढयांमधील वाद टळतो.
- इच्छापत्र न केलेने कायदयाच्या नियमाप्रमाणे मिळकतीची व्यवस्था होते जी व्यक्तीच्या इच्छा व गरजास अनुसरून असेलच असे नाही.
- आपल्या जवळच्या व्यक्तीस अथवा जास्ती गरजू व्यक्तीस अधिकची मिळकत देणे शक्य असते.
- इच्छापत्र न केलेस आपली मिळकत नावडत्या व्यक्तीस व गरज नसलेल्या व्यक्तीस मिळणेचा अधिकार प्राप्त होवू शकतो.

# इच्छापत्र करणेची प्रक्रिया

- इच्छापत्र कायदयाने निर्माण केलेला अत्यंत सोपा दस्त आहे.
- त्यास कोणत्याही स्टॅम्पची अथवा कायदेशीर क्लिष्ट भाषेची आवश्यकता नाही.
- एका साध्या कागदावर स्वत:ची माहिती, आप्तजणांची माहिती, आपल्या मिळकतीचे वर्णन व सदर मिळकत कोणाला दयावयाची आहे हे स्पष्टपणे लिहावे.
- इच्छापत्रावर दोन साक्षीदार असणे कायदयाने आवश्यक आहे,
- वैदयकिय दाखला कायदयाने आवश्यक नाही मात्र तो असणे केव्हाही चांगले.

# इच्छापत्र करणेची प्रक्रिया

- इच्छापत्र नोटराईज्ड किंवा रजिस्टर्ड करणे कायदयाने आवश्यक नाही पण केलेले चांगले. त्यामुळे पुढील वाद टळू शकतात.
- इच्छापत्राबाबत शंका असतील किंवा इच्छापत्र जास्ती किचकट स्वरूपाचे, जास्ती मिळकतीबाबत अथवा ज्या मिळकतीबाबत आपल्याला नक्की माहिती नाही किंवा केवळ एखादी मिळकत एखादया व्यक्तीच्या हयातीपर्यंत राहणेसाठी असेल व नंतर कोणाला अशी गुंतागुंत असणारे इच्छापत्र करावयाचे झालेस वकीलांचे सल्याने केलेले केव्हाही चांगले.

# दि. मेंटनन्स अॅण्ड वेलफेअर ऑफ पेरंटस अॅण्ड सिनिअर सिटिझन अॅक्ट २००७

- मुलांकडून पोटगी मिळविणेचा अधिकार
- सरकारने ठिकठिकाणी वृध्दाश्रम स्थापन्याबाबत तरतूदी
- वृध्द लोकांना वैदयकिय सेवा व हॉस्पीटल उपलब्ध करून देणेबाबत तरतुदी
- वृध्द लोकांच्या सुरक्षेतेबाबत तरतुदी

# आर्थिक बाबी

- बॅंकिंग, वित्तीय संस्था, डिमॅट अकौंट, एल.आय.सी पॉलिसी जॉइंट अथवा नॉमिनेशन स्वरूपात करणेत यावे.
- मेडिकल इंन्शुरन्स असणे हितावह.
- शक्य तितके स्वत:च्या आर्थिक स्त्रोतावरतीच अवलंबून असावे. त्यासाठी एखादया या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तीचा सल्या घ्यावा.
- रिव्हर्स मॉरगेज: तुमचे मालकीच्या राहते घर बॅंकेला तारण देवून संपूर्ण हयातीपर्यंत बॅंकेकडून रक्कम मिळू शकते. तुम्हाला बॅंकेचे कर्ज फेडणेची आवश्यकता नाही. मृत्यूनंतर बॅंक घर विकून कर्ज फेड करून घेते.


# अंमित न बरा होणारा आजार / परिस्थिती

- सर्वोच्च न्यायालय  : कॉमल कॉज विरूध्द युनियन ऑफ इंडिया (२०१८ )
- अंतिम न बरा होणारा आजार / परिस्थिती निर्माण झालेस वैदयकिय जीवन आधार काढून घेणेसाठी दस्त करणेचा कायदेशीर अधिकार व प्रक्रिया.
- दोन साक्षीदार, ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट
- प्रत आपल्या फॅमिली डॉक्टरांकडे देणे योग्य.

# अवयवदान व शरिरदान

- भारतात निकडीची गरज.
- वेगळा फॉर्म भरून देणे.
- अवयवदान व शरिरदान हे आयुष्यातील सर्वश्रेष्ठ दान आहे.

# “Winston Churchill”



# A New Beginning



# *“Thank You…”*

Adv. Dr. Shah & Associates
Phone : +91 231 253 7717, +91 231 253 6816
Mobile : +91 98230 13441
Email : advdrshah@gmail.com
Website : advdrshahnassociates.com